पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८, कामगार कल्याण विभाग
जा. क्र. काक/३/कावि/२४५/२०१८
दिनांक -०७/०९/२०१८

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय** – कंत्राटी कामगार / शिकाऊ उमेदवारांचे (Apprentice Act 1961) किमान वेतन दराबाबत.

**संदर्भ** – १. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दि. २८/०६/२०१८

२. मा. कामगार उप आयुक्त सो (ग्रा.वि.), मुंबई यांचेकडील दि. ०४/०८/२०१८ रोजीचे दर

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटदारामार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांचे दिनांक ०१/०४/२०१८ पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित करणेत आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्यांकरीता प्रसिध्द होणा-या विशेष भत्त्याचे दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे व त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी किमान वेतन दराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे.

उक्त संदर्भिय क्र. २ अन्वये दिनांक ०१/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८ या कालावधीतील विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू

(प्रमोद जगताप)
**कामगार कल्याण अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**कामगार कल्याण विभाग**

कुशल / अर्धकुशल / अकुशल व सफाई कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे

(कालावधी - दिनांक ०१/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८)

मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दिनांक २८ जून २०१८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ३,६०५.०० | १७,६०५.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ३,६०५.०० | १६,६०५.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ३,६०५.०० | १५,१०५.०० |

**कामाचे स्वरुप – सफाई कामकाज**

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार | १०,०००.०० | १,४९६.०० | ११,४९६.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. (१ + २ यावर) | १३.१५% |
| ३ | ई.एस.आय. (१ + २ + घरभाडे ५% यावर) | ४.७५% |
| ४ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ५ | रजा वेतन (१ + २ यावर) | ५.७७% |
| ६ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | रु. ६/- |
| ७ | सेवा शुल्क (१ + २ यावर)<br>अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

(प्रमोद जगताप)
**कामगार कल्याण अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८